# डॉ. कलमाडी शामराव कनिष्ठ महाविद्यालय

## वार्षिक क्रियाकलाप २०२३ – २०२४ अहवाल

## मराठी विभाग

---

- २२ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी दोन वाजता विविधता या विषयांतर्गत वार्षिक विभागीय उपक्रम घेण्यात आला. दिलेल्या विषयांतर्गत निवडलेला विषय होता विविधतेत एकता.

- या विषयाची व्याप्ती विस्तार खूप मोठा आणि सखोल आहे म्हणूनच साहित्यातील विविधता विद्यार्थ्यांना अधिक सक्षम प्रेमळ काळजी घेणारे नागरिक बनण्यास मदत करू शकते. प्रत्येकाचे अनोखे अनुभव, संस्कृती आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध करून देणे हाच या उपक्रमाचा उद्देश आहे.

- यासाठी काव्यवाचन, नाट्य वाचन, कथा वाचन, समूहगीत, सुत्रसंचालन, भाषण आणि पोस्टर बनवणे हे प्रभावी मार्ग या विद्यार्थ्यांनी निवडले.

- महान साहित्यात आपल्याला वाचक म्हणून वाहून नेण्याची शक्ती असते हा महत्त्वाचा संदेश या उरक्रमाद्वारे देण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमात उत्साही हरहुन्नरी रसिक विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांना सोनाली मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.